महासागर अमरावती

मंगळवार, दि. 15 ऑक्टोंबर 2024


पान 3

## शेतकऱ्याला 403 कोटींची शासकीय मदत मिळणार तरी केव्हा?

**अमरावती** – पश्चिम विदर्भात यावर्षी जुलै ते सप्टेंबरदरम्यान सततचा पाऊस, अतिवृष्टी यामुळे खरीप पिके, फळपिकांचे मोठे नुकसान झाले. शिवाय घरांची पडझडही झालेली आहे. यासाठी चार प्रस्तावांद्वारे विभागीय आयुक्तांनी 402.93 कोटींची मागणी शासनाकडे केलेली आहे. अद्याप शासन अनुदान अप्राप्त आहे. आता कोणत्याही क्षणी विधानसभेची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे लाडका शेतकरी शासन मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. अमरावती विभागात यंदा पावसाची सरासरी पार झालेली आहे. यादरम्यान जुलै महिन्यापासून 53 तालुक्यातील 249 महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. त्यामुळे नदी–नाल्यांना पूर येऊन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शिवाय शेतात पाणी साचल्यानेही काही भागांत पिके पिवळी पडली, सडली आहे. पुरामुळे शेतात गाळ साचला, शिवाय या आपत्तीमध्ये चार हजारांवर घरांची पडझड झालेली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये बाधित पिकांचे सर्वेक्षण करण्यात आले व शासनाकडे अनुदान मागणीचे चार प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी शासनाला पाठविले आहेत. ऑगस्ट महिन्यापासून जिल्ह्यातील बाधित पिकांसाठी व घरांची पडझड, दुकानांचे नुकसान यासाठी 403 कोटींची मागणी प्रशासनाद्वारा केली असताना शासनाद्वारा अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतकरी या अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.

# ..तर भाजपचा कार्यकर्ता म्हणून निर्णय घेवू!

## उमेदवारी न मिळाल्यास माजी मंत्री जगदीश गुप्तांचा इशारा | 'दै.महासागर' ला दिली मुलाखत



रोहित गासे

*अमरावती,( दि.14 )–महाविकास आघाडी प्रमाणेच महायुतीच्या अजुनही जागा वाटप झाल्या नाहीत. त्यामूळे विद्यमान आमदार आणि इच्छुक उमेदवार विधानसभा मतदार संघातील जागेवर आपआपल्या पक्षाचा दावा ठोकत तिकीट मिळण्याकरिता चढाओढ करित आहेत. अमरावती मतदारसंघामध्ये काँग्रेसमधून निष्काशीत करण्यात आलेल्या विद्यमान आमदार सुलभा खोडके महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढण्याच्या तयारीत आहे, तर दुसरीकडे माजी मंत्री जगदीश गुप्ता यांनी अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या या जागेवर महायुतीमधून भाजप चा दावा केला आहे. त्यांनी 'दै.महासागर' ला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये अप्रत्यक्षपणे पक्षश्रेष्ठींना इशारा देत आपल्याला भाजपची उमेदवारी न मिळाल्यास कार्यकर्ता म्हणून निर्णय घेणार असल्याचे सांगितले आहे. त्यामूळे महायुतीमध्ये बंडखोरी होण्याची भीती निर्माण झाली आहे. जगदीश गुप्तांनी मुलाखतीदरम्यान विचारलेल्या अनेक प्रश्नावर मोठ्या सफाईने उत्तर दिले.*

**प्रश्न–वर्तमान आमदार महायुतीच्या जागेवर दावा करित आहे?**

गुप्ता– वर्तमान आमदार हे काँग्रेसमधून येत आहेत. त्यामूळे येथील जागेवर महायुतीमधून भाजपचा दावा हा पहिल्यांदा चालतो, बाकीच्यांचा नंतर. तसेही या मतदारसंघाला भाजपच्या विजयाचा इतिहास आहे. भाजपची संघटनात्मक बांधणी ही बुथ स्तरावरुन झालेली आहे. या उलट राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनात्मक बांधणी येथे नाही. अमरावती हे विभागीय मुख्यालय असल्याने महायुतीमधून भाजपचे नेते येथील जागा सोडतील असे मला अजिबात वाटत नाही.

**प्रश्न–आपण विधानसभा लढणारच हे तुम्ही निश्चित केले आहे का?**

**उत्तर**– अजुन जागा वाटपाचे चित्र स्पष्ट झालेले नाही. भाजप ने उमेदवारी दिली तर नक्की लढू, निवडणूक लढायचे हे जरी निश्चित असले तरी राजकारणात पुढे काय वाढून ठेवले आहे, हे माहिती नसते. परंतू कार्यकर्ते कामाला लागले आहे. जागा वाटपाचे चित्र स्पष्ट झाल्यावर आम्ही योग्य निर्णय घेवू.

**प्रश्न–राजकिय प्रवाहाच्या बाहेर असताना विधानसभेत दंड थोपटण्याचा विचार कसा?**

**उत्तर**– मला अनेकदा हा प्रश्न आवर्जुन विचारतात, परंतू वास्तवात मी कधीच राजकिय प्रवाहाच्या बाहेर नव्हतो, मी पक्षातच होतो, फक्त पक्षातील कोणत्या पदाची जबाबदारी माझ्यावर नव्हती. मी कार्यकर्ता म्हणून भाजपमध्ये सक्रीय होतो. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी विधानसभा निवडणूकीत लढणार आहे.

**प्रश्न–कोणत्या मुद्यावर निवडणूक लढविणार?**

**उत्तर**–मुद्दे खूप आहे, जेव्हा उमेदवार म्हणून मी प्रसार माध्यमांना समोर जाईल, तेव्हा ते सर्वांच्या समक्ष मांडू. एक प्रमुख मुद्दा सांगायचे झाल्यास अमरावतीमध्ये सध्या राजकीय आरोप, प्रत्यारोपाचा स्तर खूप घसरलेला आहे. हा स्तर कसा सुधारता येईल आणि अमरावतीला सुदृढ राजकारणाचे जुने वैभव कसे मिळवून देता येईल, याला माझी प्राथमिकता राहील.

**प्रश्न–लोकसभेचा अनुभव पाहता येथे काँग्रेसची एक पक्की वोट बँक आहे?**

**उत्तर**– हा तुमचा गैरसमज आहे, विशेषत्वाने प्रसार माध्यमांतून हा चुकीचा विषय जनतेसमोर मांडण्यात आला आहे. काँग्रेसची वोट बँक ही अल्पसंख्यांक आहे, मात्र भाजपकडे बहुसंख्य वोट बँक आहे, लोकसभेची जागा फक्त 19 हजार मतांनी आम्ही पराभूत झालो आहे. याचा अर्थ आमची वोट बँक कमी आहे, असा होत नाही. यापुर्वीही विधानसभेत अनेकदा येथे भाजपने विजय मिळविला आहे. प्रत्येक पक्षाकडे आपली वोट बँक असते, फक्त निर्णायक वोट हे इकडून तिकडे जात असतात.

**प्रश्न–महापालिकेवर प्रशासक असल्याचे येथे लोकांना योग्य सुविधा मिळत नाही?**

**उत्तर**–हे शंभर टक्के बरोबर आहे, गेल्या अडीच–तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक आहेत, लोकप्रतिनिधी नाही. त्यामूळे प्रशासनावर लगाम लावणे कठीण होत आहे. आमदार–खासदार हे पुर्ण वेळ महापालिकेत बसू शकत नाही. त्यांना राज्यस्तरावर व केंद्र स्तरावरील सुविधा व समस्यांच्या बाबतीत विचार करावा लागतो. जो पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांवर लोकप्रतिनिधी निवडून जाणार नाही, तोपर्यंत ही परिस्थिती सुधारणार नाही.

**प्रश्न–तुम्ही यापुर्वी युतीवर लढले, आता तुम्हाला काय फरक जाणवेल?**

**उत्तर**–बाळासाहेबांच्या नेतृत्वातील शिवसेनेची भूमिका कट्टर हिंदुत्वाची राहीली आहे. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याच भुमिकेशी ठाम असलेल्या शिवसेनेचे नेतृत्व करित आहेत. त्यामूळे फारसा फरक जाणवेल असे वाटत नाही.

**प्रश्न–तुमची हिंदुत्वाची भूमिका ठाम राहील का?**

**उत्तर**– प्रश्नच येत नाही, आम्ही कट्टर हिंदुत्ववादी आहोत. आमची हिंदुत्वाची परिभाषाही वेगळी आहे. जो या मातीला माता मानेल त्याला आम्ही हिंदू मानतो, तो कोणत्या जात, पंथ, धर्माचा आहे, हे आम्ही पाहत नाही. त्यामूळे आमची हिंदुत्वाची भूमिका पुर्वीपासून ठाम आहे.

## सावकारी परवाना असल्याचे सांगून 5 लाखांची फसवणूक

### संभाजीनगर येथील तरुणावर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 )**– संभाजी नगरातील गंगापूर टाकळीवाडी येथे राहणार्या आरोपीने अमरावती येथील एका व्यक्तीला सावकारी परवाना असल्याचे सांगून 5 लाखांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. सुजित श्यामलाल मिश्रा (59, अमर कॉलनी, बायपास मार्ग, अमरावती) यांच्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी साहेबसिंग रूपसिंग घुनावत (घुनावत माडा, टाकळी वाडी, गंगापूर, संभाजीनगर) व एका महिलेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे .

आरोपी साहेबसिंग रुपसिंग घुनावत या महिलेने फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील अमर कॉलनीत राहणारे सुजित मिश्रा यांना सावकारी परवाना असल्याचे सांगितले. त्यावर आरोपींनी डिसेंबर 2021 ते 20 एप्रिल 2024 पर्यंत सुजित मिश्रा यांच्याकडून 5 लाख रुपये घेतले. सावकार कायद्यांतर्गत आवश्यक परवाना असल्याची खोटी माहिती आरोपींनी सुजितला देऊन सुजित मिश्रा यांची 5 लाख रुपये घेऊन फसवणूक केली. याशिवाय ?क्सिस बँकेच्या बँकिंग ?पवर खोट्या पावत्या दाखवून त्यांनी सुजित मिश्रा यांची फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सुजितने फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी साहेबसिंग रूपसिंग घुनावत व एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## तिघांजवळ सापडले तीन चाकू

### आरोपींना केली अटक | शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 ची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 )** – शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने 12 ऑक्टोंबर रोजी फ्रेजरपुरा हद्दीत तीन जणांना ताब्यात घेऊन, त्यांच्याजवळील चाकू सारखे तीन घातक शस्त्र जप्त केले. सम्राट रवींद्र फुले (19, रा. प्रबुध्द नगर, वडाळी), प्रफुल उर्फ सोनु अजय वानखडे (23, रा. एकता नगर, बिच्छु टेकडी, अमरावती) व प्रथम रवींद्र इंगोले (23, रा. पंचायत समीती, भातकुली, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत.

पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी शहरातील अवैध धंदयावर तसेच तडीपार व शस्त्र बाळगणार्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने 12 ऑक्टोंबर रोजी पेट्रोलींगदरम्यान तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. तसेच पोलिसांना तडिपार आरोपी सम्राट रवींद्र फुले हा मिळून आला. त्यामुळे त्याच्याविरूध्द फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कलम 4/25 आर्म ॲक्ट सहकलम, 135, 142 महाराष्ट्र पोलिस कायद्याप्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे साहेब, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली युनिट 2 चे सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले, पोलिस उपनिरीक्षक संजय वानखडे, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमूख, संग्राम भोजने, नईम बेग, मंगेश शिंदे, राजीक रायलीवाले, चेतन कराडे, योगेश पवार, निलेश वंजारी, सागर ठाकरे, संदीप खंडारे, चेतन शर्मा, राहुल दूधे यांनी केली आहे.

## पकड वॉरंटमधील आरोपींना अटक

### आतापर्यंत मध्यप्रदेशातील 76 आरोपीतांना अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 )**– मोर्शी पोलिसांनी पकड वॉरंट तामीलसबंधाने विशेष मोहिम राबवून चार आरोपींना अटक केली. संजय शामराव ईवनाते (34,रा. डंगरी फाटा, गारगुड रैयत गर्गुद, जि. बैतुल), शेख नसीम शेख कासम (39), शेख वसीम शेख कासम (39) व शेख कासम शेख बशीर (74 सर्व रा. सालबर्डी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तसेच पोलिसांनी मध्य प्रदेश राज्यातील एकुण 76 आरोपीतांना अटक केली आहे.

पोलीस अधिक्षक यांच्या आदेशानुसार मोर्शी पोलिसांनी 13 ते 14 ऑक्टोबरदरम्यान पकड वॉरन्ट तामील संबंधाने विशेष मोहीम राबविली. या विशेष मोहीमदरम्यान मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील, मध्यप्रदेश राज्यात राहणारे, बरेच वर्षापासुन न्यायालयात तारखेवर हजर न झालेले तसेच सन 2018 पासुन बलात्काराचे गुन्ह्यातील फरार असलेल्या पकड वारन्टमधील आरोपींना अटक केली. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, मोर्शीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनात डि.बी पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरकुल एएसआय रवी तायडे, संतुलाल उईके, पोलिस हवालदार स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते आणि बिट अंमलदार यांनी केलेली आहे.

## ग्रामीण हद्दीत ऑपरेशन ऑल आऊट

### शेकडो आरोपींची धरपकड | 44 पोलीस अधिकारी व 201 पोलीस अमंलदारांचा समावेश



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 )**– आगामी नवदुर्गा विसर्जन तसेच सण उत्सवाच्या अनुषंगाने गुन्हेगारांवर वचक निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्याच्या दृष्टीने आणि मालमत्तेच्या गुन्ह्यांवर अंकुश लावण्याकरीता अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात 11 ऑक्टोबर रोजी रात्री 1 ते पहाटे 5 वाजेपर्यंत ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात आले. सदर मोहिमेत 44 पोलीस अधिकारी व 201 पोलीस अमंलदारांनी गुन्हेगारांची झाडाझडती घेऊन शेकडो आरोपींची धरपकड केली.

सदर मोहिमेत महत्वाचे रस्त्यांवर, जिल्हा व राज्य सिमेवर सशस्त्र नाकाबंदी करून वाहनांची आणि सराईत गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. गुन्हेगारांची आश्रयस्थानांवर जाऊन तडीपार आरोपी, पकड वॉरंटमधील आरोपीचा शोध घेण्यात आला. त्याचप्रमाणे अमरावती ग्रामीण हद्दीतील धाबे, हॉटेल, लॉजेसची सुध्दा पाहणी करण्यात आली. तसेच अवैध व्यवसायातील दारु, जुगार, गुटखा, अमंली पदार्थ तपासणी करण्यात आली आहे.

### नाकाबंदीत 54 वाहनांची तपासणी

सदर मोहिमेत एकुण 12 जमानती वॉरंट व 9 समंन्स बजावणी करण्यात आली. ऑल आउट ऑपरेशनदरम्यान शस्त्र अधिनियमान्वये 1 आरोपीतांवर कार्यवाही करुन जेरबंद करण्यात आले आहे. तसेच नाकाबंदी दरम्यान 54 वाहनांवर कार्यवाही करण्यात आली. बॉक्स

### 16 लाख 20 हजाराचा मुद्देमाल जप्त

अवैध धंद्यावरील कार्यवाहीत 8 केसेस करण्यात आल्या असून, यामध्ये 24 हजार 320 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मोशी, शिरजगाव कसबा व स्थानिक गुन्हे शाखेने रेती चोरी कारवाईच्या 3 केसेसमध्ये 16 हजार 20 हजार रुपयांचा तसेच येवदा येथे गोवंश अनुषंगाने 1 केसमध्ये 31 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### पकंड वॉरंटमधील सात आरोपींना अटक

सदर मोहीमेदरम्यान पोलिसांच्या अभिलेखावर पाहिजे म्हणून घोषीत असलेला विक्की मधुकर घोडेस्वार (रा. मांजरखेड, ता. चांदुर रेल्वे) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. येवदा व स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने अब्दुल अकील अब्दुल वहिद (30, रा. इंदीरा नगर, येवदा) या आरोपीतांविरुध्द शस्त्र अधिनियमान्वये कार्यवाही केली आहे. त्याचप्रमाणे गोपाल नारायण लोंडे (45, रा. आनंद नगर, वरुड), प्रमोद प्रभाकर धाकतोडे (25, रा. इंदीरा नगर, येवदा), आकाश उर्फ बाबु सिताराम डोईफोडे (24,रा. पेन्शनपुरा, परतवाडा) यांना संशयास्पदरित्या फिरतांना ताब्यात घेतण्यात आले. त्यांच्याविरुध्द कलम 122 महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये कार्यवाही करण्यात आली. सदर मोहीमेत पकड वॉरंटमधील एकुण 7 आरोपीतांना अटक करण्यात आली.

## वाहन चोरीतील आरोपीला अटक



### शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 ची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 )**– शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने राजापेठ हद्दीतील वाहनाच्या चोरी प्रकरणात एका आरोपीला 14 ऑक्टोबर रोजी अटक केली. सार्थक राजेंद्र वानखडे (22, रा. शेगाव, कामगार कल्याणजवळ, अमरावती) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातून 1 लाख रुपये किमंतीचे वाहन जप्त केले आहे.

पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी शहरातील वाहनचोरीचे गुन्हे उघडकिस आणण्याबाबत निर्देशीत केले होते. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 चे पथक राजापेठ ठाण्यातील वाहन चोरीचा समांतर तपास करीत होते. दरम्यान 14 ऑक्टोबर रोजी पोलिस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांनी गुप्त माहितीवरून संशयीत आरोपी सार्थक राजेंद्र वानखडे याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केल्यानंतर त्याने त्याने राजापेठ हद्दीतील वाहन चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी चोरी गेलेले टाटा एस कंपनीची वाहन क्रमांक एमएच 04 ईबी 0714 जप्त केले. पुढील तपासकामी आरोपी व वाहन राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली एपीआय महेश इंगोले, पीएसआय संजय वानखडे, पोलीस अंमलदार–दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमूख, संग्राम भोजने, नईम बेग, मंगेश शिंदे, राजीक रायलीवाले, चेतन कराडे, योगेश पवार, निलेश वंजारी, सागर ठाकरे, संदीप खंडारे, चेतन शर्मा, राहुल दूधे यांनी केली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# धामणगाव रेल्वे विधानसभेसाठी महाविकास आघाडीत रस्सीखेच

## महायुतीत मात्र प्रताप अडसड पक्के

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.14 )-** अवघ्या महिन्याभरावर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीचा ज्वर दिवसेंदिवस वाढत असून धामणगाव रेल्वे विधानसभेसाठी प्रचंड रस्सीखेच सुरू आहे. महाविकास आघाडीत काँग्रेसचे वीरेंद्र जगताप, उबाठाचे अभिजीत ढेपे यांच्या तिकिटसाठी घमासान सुरू असून महायुती कडून मात्र भाजपाचे आमदार प्रताप अडसड हे एकमेव शिलेदार असल्याचे दिसून येत आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे वीरेंद्र जगताप यांच्याविरूध्द भाजपचे प्रताप अडसड यांनी 10 हजार मतांच्या फरकाने विजय मिळविला होता. मागील तीन पंचवार्षिक मध्ये झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष व काँग्रेस यांच्यातच लढती झाल्या होत्या. त्यामुळे 2024 च्या निवडणुकीसाठी वीरेंद्र जगताप यांनी चांगलीच कंबर कसली, परंतु जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी महाविकास आघाडीच्या पक्ष असलेल्या शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये पक्षप्रवेश करून धामणगाव रेल्वे विधानसभेसाठी दावा ठोकल्याने वीरेंद्र जगताप यांच्या समोर चिंतेचे सावट उभे झाले आहे. तसेच शिवसेना उबाठाच्या स्थानिक वरिष्ठ नेत्यांनी सुद्धा धामणगाव रेल्वे विधानसभेमध्ये कुठल्याही परिस्थितीत उबाठा साठीच खेचून आणायचा असा चंग बांधला असून धामणगाव विधानसभेसाठी कुठलीही तडजोड होणार नाही, असा निर्धार केल्याने महाविकास आघाडीतील काँग्रेस व शिवसेना उबाठा मध्ये तिकिटसाठी चांगलीच रस्सीखेच झाल्याचे दिसून येत आहे. तर दुसरीकडे मात्र महायुतीमध्ये भाजपचे आमदार प्रताप अडसड यांनी केलेल्या कोट्यावधींची विकास कामे व त्यांचा मनमिळाऊ स्वभावामुळे भाजपातील घटक पक्ष व भाजपा कार्यकर्त्यांमध्ये एकच वादा प्रताप अडसडांचा या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचे दिसून येत आहे.





### शिवसेनेला संधी

*अभिजीत ढेपे च्या शिवसेना (उबाठा) प्रवेशामुळे शिवसेनेचं प्राबल्य वाढत असून अभिजित ढेपे यांची सहकार क्षेत्रात असलेली पकड व मतदार संघात असलेला दांडगा संपर्क यामुळे शिवसेनेला गतवैभव प्राप्त करण्यासाठी ही एक संधी असल्याची शिवसेना गटामध्ये चर्चा आहे. त्यामुळे ही निवडणूक रंगतदार होणार असून तिकिटासाठी होत असलेल्या धावपळीमुळे महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये झुकते माप कोणाला मिळणार याची उत्सुकता लागली आहे.*

# भाजपच्या माजी खासदार नवनीत राणांना पुन्हा धमकीचे पत्र

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 14 )-**भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा यांना सोमवारी पुन्हा धमकीचे पत्र मिळाले असून, अमरावती पोलीस नवनीत राणा यांच्या घरी पोहोचले. यासंदर्भात राजापेठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.

गेल्या 11 ऑक्टोबरला अमीर नावाच्या व्यक्तीने धमकीचे पत्र माजी खासदार नवनीत राणा यांना पाठवले होते. त्या अनुषंगाने पोलिसात तक्रार सुद्धा करण्यात आली होती. सोमवारी पुन्हा धमकीचे पत्र माजी खासदार राणा यांना प्राप्त झाले आहे.



त्यामुळे पोलिसांनी ताबडतोब या धमकी देणार्याचा शोध लावावा. कारण महाराष्ट्रामध्ये सध्या नुकत्याच झालेल्या माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर महाराष्ट्राचं वातावरण तापलेलं आहे. असे असताना हे धमकीच पत्र पुन्हा आलं; त्यामुळे नवनीत राणा यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी सदर अमीर नावाच्या व्यक्तीचा शोध लावावा व नवनीत राणा यांना योग्य ती सुरक्षा देण्यात यावी. तसेच या मागचा खरा सूत्रधार ताबडतोब शोधावा,अशी मागणी माजी खासदार नवनीत रवी राणा यांचे स्वीयसहायक विनोद गुहे यांनी राजापेठ पोलिसांकडे केली आहे.

# विभागीय लोकशाही दिनात 12 प्रकरणांवर सुनावणी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती** - नागरिकांकडून प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही होणे आवश्यक आहे. विभागीय लोकशाही दिनाकरिता दाखल प्रकरणांचा संबंधित विभागाकडून वेळेत अहवाल प्राप्त करुन प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी सर्वंकष प्रयत्न करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित तक्रारदारांना लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे, असे निर्देश उपायुक्त गजेंद्र बावणे यांनी आज दिले.

# देऊरवाडा काजळी येथील सीताफळ इतर जिल्ह्यातही मागणी

## उत्पादन बरोबर ग्राहकही वाढले

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार,( दि.14 )-** सर्वसामान्यांचा गावरान मेवा म्हणून ओळख असलेल्या सीताफळांची बाजारात आवक होण्यास प्रारंभ झाला आहे. साधारणपणे विजयादशमी संपताच सीताफळांची बाजारात आवक सुरू होते. चांदुर बाजार मधील जयस्तंभ चौक आणि बाजारात ठिकठिकाणी सीताफळांची दुकाने लागल्याचे दिसून येत आहे. देऊरवाडा काजळी येथील सिताफळांना इतर जिल्ह्यातही मागणी आहे. दिवसेंदिवस सिताफळाच्या उत्पादनाबरोबरच ग्राहकही वाढत

साधारणपणे विजयादशमी संपताच सीताफळांची बाजारात आवक सुरू होते. सध्या विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात विक्रेते बसलेले दिसून येतात. परंतु, दर आवाक्यात नसल्याने सामान्य ग्राहकांना त्यांचा आस्वाद घेणे कठीण झाले आहे.सीताफळाचे दर महाग असले तरी हंगामी व पौष्टिक फळ म्हणून आवडीने जाते. त्यामुळे ग्राहकांनी सीताफळांना विशेष मागणी असल्याची फळ विक्रेत्याचे म्हणणे आहे. दसऱ्याच्या दरम्यान सीताफळ बाजारात येतात. परंतु यावर्षी समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे गरिबांना ग्रामीण सुकामेवा म्हणून ओळख असलेल्या सीताफळांची आवक उशिरा सुरु झाली.कमी खर्चात अधिक उत्पादनकमी खर्चात पुरेसे उत्पादन देणारे फळ म्हणून सीताफळ ओळखले जाते.



### प्रती कॅरेट 1500 ते 1700

*देऊरवाडा, काजळी, ब्राम्हणवाडा थडी, कोदोरी, निंभोरा येथील सीताफळ रुचकर लागत असल्याने त्यांची मागणी अधिक वाढत आहे. येथील सिताफळाला भाव देखील चांगला मिळत आहे. एका कॅरेट मध्ये 80 ते 90 सीताफळ असतात त्याला प्रति कॅरेट 1500 ते 1700 रुपये भाव आहे.*

सीताफळाचा हंगाम जून ते जानेवारी दरम्यान तीन बहरत असतो. जून ते ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर, अंतिम बहार हा जानेवारी आणि फेब्रुवारीचा असतो. जून ते ऑक्टोबरच बहर बाजारात आला आहे. सीताफळ लागवड ही शेतकऱ्यासाठी फायद्याची ठरते. सीताफळाला औषधे फवारणी आणि खतांसाठी फारसा खर्च नसतो. यामुळे कमी खर्चात जास्त उत्पादन मिळते. या माध्यमातून हंगामी रोजगार सुद्धा उपलब्ध झाला आहे. बहुगुणी सीता फळात भरपूर कॅल्शिअम, प्रोटीन, फायबर, व्हिटॅमिन असतात. सीताफळ खाण्यासाठी जितके चविष्ट आहे. तितकेच आरोग्यासाठी फायदेशीर आहे. पित्त शामक, तषाशामक, पौष्टिक, रक्तवर्धक, बलवर्धक, वातदोष कमी करणारे व ह्दयासाठी सीताफळ फायदेशीर आहे. ह्दयरोग व मधुमेह या आजारात उपयुक्त आहे. रक्तवाढी सोबत पित्त आणि ?सिडीटीचा त्रास कमी करणारे ऊर्जेचा स्त्रोत असणारे हे फळ आहे. सीताफळाच्या बियांचा केशवर्धक औषधी बनविण्यासाठी अथवा भुकटी करून रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी वापर केला जातो.

# जग्राता कार्यक्रमाने दणाणले जामगाव

## जय दुर्गा मंडळाचे आयोजक

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड ( दि.14 )** - तालुक्यातीन जामगाव खडका येथे नवरात्रोत्सव निमित्त नवदुर्गा त्रिशूल मंडळामध्ये जग्राता कार्यक्रम नुकताच पार पडला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रहार जनशक्ती पक्षाचे वरुड मोर्शी विधानसभा प्रमुख डॉ. महेंद्र राऊत, भाजपाचे वरुड मोर्शी अतिरिक्त विधानसभा प्रमुख अमित कुबडे आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमाने जामगाववाशीयांचे लक्ष वेधले गेले.

गत काही वर्षापासून जामगाव खडका येथील बाजार चौकामध्ये नवदुर्गा त्रिशूल मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात येते. या मंडळामार्फत विविध सामाजिक कार्यक्रम घेतल्या जाते दरवर्षी वेगवेगळे देखावे साजरे केल्या जाते, यावर्षी तर माता राणीचा जग्राता कार्यक्रम ठेवून संपूर्ण गाव दणाणून टाकले. मंडळातील पदाधिकारी गावकऱ्यांचे सहकार्य घेऊन उपक्रम राबवित आहे.



या कार्यक्रमाला अनेक सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभत आहे. या कार्यक्रमाला गावातील तरुण, तरुणीसह अबालवृध्द उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय मगर्दे, घनश्याम सोनारे, मिलिंद गीद, देवेंद्र ठाकरे, मंडळ अध्यक्ष गौरव वडुकले , आकाश ठाकरे, राहुल भगत, छोटू घोंगडे, उमेश राऊत, प्रणित बहुरुपी , प्रदीप घोडकी, तुषार गावंडे, रोशन वानखडे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# मोर्शी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.14 )-** मोर्शी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी व मोर्शी तालुका पॉवर ऑफ मीडिया, आणि डी एम एक्स ग्रुप महाराष्ट्र राज्य , मोर्शी रक्तदाता संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.20 ऑक्टोबर रोजी मोर्शी अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या समोर भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.


अल्पावधीतच मोर्शी तालुक्यात नावलौकिक झालेल्या मोर्शी अर्बन पतसंस्थेच्या वतीने संस्थे चे सामाजिक दायित्व म्हणून रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचा संस्थेच्या वतीने दोन लाख पन्नास हजार रुपयाचा मोफत विमा काढल्या जाणार आहे. तरी रक्तदात्यांनी या संधीचा लाभ घेऊन रक्तदान शिबिरात उपस्थित राहून रक्तदान करण्यात यावे असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# त्या अपघात प्रवणस्थळावर लावले झेब्रा क्रॉन्सींग

**अमरावती** - राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एम. आय.डी.सी. रोड स्थितल गोपाल नगर टी पॉईट परिसरात ट्रक क्रमांक एम.एच.46-ए.एफ.0593 व दुचाकी क्रमांक एम.एच.27-सी.ई.2618 यांच्यामध्ये घडलेल्या अपघातामध्ये एक तरुणास आपले प्राण गमवावे लागले आहे. तसेच त्याचा दुचाकीवरील सहकारी गंभीररित्या जखमी झाला आहे. ही घटना 8 ऑक्टोबर रोजी दुपारी 12.30 वाजताच्या सुमारास घडली होती. या अपघातानंतर राजापेठ तथा वाहतुक शाखेच्या पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतला. त्यावेळी नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

# प्रेक्षकांना ‘वचपा’ लघुचित्रपटाची प्रतिक्षा

## चांदूर रेल्वे शहरात झाले संपुर्ण चित्रीकरण



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.14 )-** शहरातील साहस फिल्म निर्मित ‘वचपा’ या लघु-चित्रपटाचे टीझर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले. या टीझरला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून प्रेशकांना टिझर पाहूनच या लघुचित्रपटाची प्रचंड उत्सुकता लागली आहे. वचपा या लघुपटाचे लेखक व दिग्दर्शक चेतन भोले असुन लघुपटाची निर्मिती विनय कडू व नंदा वाधवानी यांनी केली आहे.

या लघुचित्रपटात प्रमुख भूमिकेत टीव्ही स्टार अनुज ठाकरे व सोबतच ईशा वानखडे, गजानन गिरी, बाल कलाकार साची कोहरे, प्रफुल्ल कोठेकर, सपना वानखडे, राजीव भांगे, अक्षय कर्से, केतन कळंबे, संदीप श्रीवास, अमेय नेवारे, मयंक शिंदे आदी कलाकारांनी काम केले. लघुपटाचे संपूर्ण चित्रीकरण उमेश महाडिक यांनी केले. तसेच फोटोग्राफी अनिकेत बागडे, शुभम गवई, मेकअप विजया शिंदे व सह दिग्दर्शन ओम गडलिंगकर, शुभम लहाने, गजानन गिरी यांनी सांभाळले. वचपा चित्रपटाची आतुरतेने प्रेक्षक वाट पाहत आहेत.

### समाजातील ज्वलंत समस्येवर हे कथानक आधारित - चेतन भोले



*लघुपटाच्या शीर्षकाबाबत व कथेबाबत लेखक व दिग्दर्शक चेतन भोले यांनी सांगितले की, समाजातील अत्यंत ज्वलंत समस्येवर हे कथानक आधारित आहे. परंतु लघुचित्रपटाची कथा, पात्र, कथानक काल्पनिक आहे. ही सामाजिक समस्या कोणती आणि शीर्षकाचा अर्थ काय या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रेक्षकांना लघुचित्रपटातच मिळतील. सदर चित्रपटाचे चित्रीकरण चांदूर रेल्वे शहरात झाले असुन यात जास्तीत जास्त कलाकार स्थानिक आहे. सदर लघुचित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल अशी अपेक्षा आम्हाला आहे.*

# विजयादशमीच्या पर्वावर रावण दहन

## अनेक वर्षांची परंपरा आजही कायम ■ साकारला चाळीस फुटाचा रावण

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.14 )-** सत्याचा असत्यावर, दुर्जनशक्तीवर सज्जनशक्तीच्या विजयाचे पर्व म्हणून विजयादशमीचा म्हणजेच दसऱ्याची ओळख आहे. येथील काठीपूरा येथे विजयदशमीच्या पर्वावर रावण दहनाची अनेक वर्षांची परंपरा यंदाही राखत रावणाचे दहन करण्यात आले. दसरा महोत्सव समिती व बलराम व्यायाम शाळेच्या माध्यमातून याही वर्षी रावणदहन आणि शस्त्र पूजनाच्या कार्यक्रम पार पडला. यावेळी माजी आमदार रमेश बुंदीले, माजी नगराध्यक्ष ॲड.कमलकांत लाडोळे, ठाणेदार प्रकाश अहीर, देविदास पा. वाळके, रामभाऊ टेकाम, अशोक ब्रृहानपुरे, प्रसाद संगई, विवेक संगई, सचीन गावंडे, सचीन जायदे, ज्ञानेश्वर नायडकर, ममता जैस्वाल, प्रियंका मालठाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.





यावेळी चित्तथरारक प्रात्यक्षिकासह लहान मुलामुलींनी देखणी लेझीम चे सादरीकरण करित उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर स्थानिक लोकपरंपरेनुसार अंजनगांव सुर्जी येथील नागारीक रावणास व सिध्देश्वर महादेवास सोने अर्पण करुन राम, लक्ष्मण, सिता या पात्रांचे हस्ते रावणाच्या प्रतीकृतीचे दहन झाल्यावर गावात सोने वाहण्याची सुरवात केल्या गेली. याही वर्षी या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती राखली होती. तब्बल चाळीस फूटाची रावणाची प्रतीकृती उपस्थितांच्या आकर्षणाचे केंद्र बनले होते.

नागरिकांचे, आबालवृद्धांचे सहभागातुन दसरा महोत्सव कसल्याही प्रकारे गालबोट न लागता शांततेत आनंदाने पार पडला. रावण दहन तथा विजयादशमी महोत्सव समितीने दरवर्षी प्रमाणे नागरीकांनी जो प्रतिसाद दिला. त्याकरिता रावन दहन समितिचे सचिन जायदे, अमोल पटेल, अवी ढेंगे, अनील जवंजाळ , संतोष ठणगण, गजानन बारड, आर्यन जायदे, शेवाने व विजयादशमी महोत्सव समितीचे शंकर मालठाने, भुपेंद्र भेलांडे, सुनिल चोपडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# खाजगी बसची दुचाकीला धडक

## दुचाकीस्वार शेतकरी गंभीर

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.14 )-** नागपूरहून बुरहानपुरला जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स बसने ढगा गावालगतच्या शेतकऱ्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये दुचाकीचालकाचा एक पाय निकामी होऊन गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली.

अनिल घोरमाडे (55 रा.ढगा) नावाने जखमी शेतकऱ्याची ओळख पटली आहे. सदर शेतकरी दुचाकी क्र.एमएच 31/ एव्ही 2468 ने सकाळी साडे नऊ वाजताच्या दरम्यान शेतात जात होते. नागपूर वरून बरहानपुरला जाणाऱ्या खाजगी प्रवासी वाहतुक करणारी बस क्र.एमपी 48/ झेडडी 5983 ने मागुन येऊन जोरदार धडक दिली. यामध्ये दुचाकीचालक गंभीर जखमी होऊन एक पाय निकामी झाला. गंभीर जखमीला वरुडच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. वरूड पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा करून अपघातग्रस्त जप्त करण्यात आले. पोलिसांनी बस चालकाविरुद्ध कलम 281,125 (बी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असुन घटनेचा पुढील तपास वरुड पोलिस करीत आहे.

